संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-20

24 SEP 2025

प्राप्त झाले सही..................

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील उपसंचालक संवर्गाच्या अधिकाऱ्यांच्या बदली आदेशामध्ये अंशत: बदल करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
शासन आदेश क्रमांक:-संलेको-२०२५/प्र.क्र.१२२/कोषा. प्रशा-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :-२४.०९.२०२५.

**संदर्भ:-** वित्त विभाग, शासन आदेश, क्र. संलेको-२०२५/प्र.क्र.५१/कोषा प्रशा-२ , दि.१९.०६.२०२५.

## शासन आदेश

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील उपसंचालक संवर्गातील अधिकाऱ्यांच्या संदर्भाधीन आदेशान्वये प्रशासकीय बदल्या करण्यात आल्या आहेत. सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक दिनांक ११.०२.२०१५ मधील तरतूदीनुसार आणि महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४ (४) व ४ (५) नुसार संदर्भीय आदेशातील खालील विवरणपत्रात नमूद केलेल्या उपसंचालक संवर्गातील अधिकाऱ्यांच्या पदस्थापनेत अंशत: बदल करून त्यांना विवरणपत्रातील स्तंभ क्र.४ मध्ये नमुद केलेल्या पदावर मुदतवाढ/सुधारीत पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ. क्र | अधिकाऱ्यांचे नाव व पद | संदर्भाधिन आदेश दि.१९.०६.२०२५ अन्वये दिलेली पदस्थापना | मुदतवाढ/सुधारीत पदस्थापना |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १ | श्री. किरण हिंदुराव भिलारे | उपसंचालक (लेखा), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई. | मुख्य लेखा अधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर या पदावर १ वर्ष मुदतवाढ. |
| २. | श्री. धनराज वागंबर पांडे | मुख्य लेखा अधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर. | मुख्य लेखा अधिकारी, नांदेड महानगरपालिका, नांदेड. |

२. श्री. पांडे यांनी बदली झालेल्या पदावर तात्काळ रुजू व्हावे. पदस्थापनेच्या पदावर रुजू न झाल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ मधील तरतूदींनुसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

३. बदलीच्या ठिकाणी हजर होताच शासनास तसेच, संचालक, संचालनालय लेखा व कोषागारे, मुंबई यांना अवगत करावे.

४. श्री. पांडे यांनी त्यांच्या नवीन पदाचा कार्यभार स्विकारताच त्यांच्या वैयक्तिक माहितीचा तपशील HRMS मधील नमून्यात भरून नवीन कार्यालय प्रमुखांमार्फत वित्त विभाग तसेच, संचालनालय, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई या कार्यालयास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ता. र. पवार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर. *
२. संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई.
३. संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकण भवन, नवी मुंबई. *
४. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, जि.ठाणे.*
५. आयुक्त, नांदेड महानगरपालिका, नांदेड. *
६. उप सचिव, मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
७. संबंधित अधिकारी*
८. निवडनस्ती कोषा प्रशा-२ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

(*संचालक, लेखा व कोषागारे, संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)